सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**कारागृह व सुधारसेवा विभाग**
**कारागृह उपमहानिरीक्षक**
**पूर्व विभाग, वर्धा रोड, नागपूर.**


दुरध्वनी क्र. (०७१२)२२४८८१३
फॅक्स क्र. (०७१२)२२४८८४४

Email ID – dignagpur-mh@gov.in
digprisonseast@gmail.com


जा.क्र. काउमनि/विपश्यना शिबीर/ 1104 /२०२३पूवि-१०, नागपूर-२० दि. १७.०३.२०२३

**प्रती,**

**अध्यक्ष,**
**समता फाउंडेशन, मुंबई**

**विषयः- विपश्यना शिबीर आयोजीत करण्याची परवानगी मिळणेबाबत.**

**संदर्भ:-** आपले पत्र दिनांक १३.०३.२०२३

उपरोक्त संदर्भान्कित विषयान्वये आपण समता फाउंडेशन, मुंबई या संस्थेमार्फत पुर्व विभागातील नागपूर, अमरावती मध्यवर्ती, अकोला जिल्हा व मोर्शी खुले कारागृहामध्ये बंदयांकरीता विनश्यना (ध्यान साधना) शिबीर आयोजीत करण्याची परवानगी मागीतलेली आहे.

त्यानुसार आपणास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन मा. कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांनी **मान्यता** दिलेली आहे.

१. शिबीराचे आयोजनासाठी दिनांक वेळ व कालावधी याबाबत अधीक्षकांशी संपर्क साधावा.
२. कोरोना नियमावलीचे पुर्णपणे पालन होईल याकरीता कारागृह अधिक्षकांनी नियोजन करुन कटाक्षाने लक्ष दयावे
३. शिबीराचे नियोजित दिनांकाच्या एक दिवस अगोदर शिबीरामध्ये सहभागी वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांचे नावाची यादी अधीक्षकांना सादर करावी लागेल, यादीमध्ये नमुद व्यक्तिंनाच ओळपत्राच्या आधारे कारागृहात प्रवेश दिला जाईल.
४. कारागृह येते वेळी स्वतःचे ओळखपत्र कारागृह अधीकाऱ्यांना दाखवावे लागेल तदनंतरच कारागृहात प्रवेश दिला जाईल. सदरचे क्षेत्रकार्य कारागृहाचे शिक्षक/अधिकाऱ्यांचे उपस्थितीत करण्यात यावे.
५. कारागृहातील कोणत्याही बंदयाचे वा परिसराचे छायाचित्र काढता येणार नाही.

६. कारागृहात नेण्यास आक्षेपार्ह असलेल्या वस्तु मोबाईल, चलनी नोटा, कॅमेरा इत्यादी कारागृहाच्या मेनगेटवर जमा करावयात.

७. कारागृहातील बंदयांशी बेकायदेशिर स्वरुपाचे कुठलेही संबंध ठेवता येणार नाही.

८. कारागृहाची सुरक्षितता, शांतता व सुव्यवस्थेत बाधा येईल अशी कोणतीही कृती करु नये.

**(मा. काउमनि यांचे मान्यतेने)**

17.3.202

**(आर.बी.डाबेराव)**
स्वीय सहाय्यक
कारागृह उपमहानिरीक्षक
पूर्व विभाग, नागपूर.

प्रत :- अधिक्षक, नागपुर/ अमरावती मध्यवर्ती, अकोला जिल्हा व मोर्शी, खुले कारागृह यांना माहीती व कार्यवाहीसाठी सादर.